ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 3.8014(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 7 | APRIL - 2017

REVIEW OF RESEARCH

# युरोपातील बदलते स्थानिक राजकीय नेतृत्व

मंगेश कदम
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ मुंबई.

*प्रस्तावना :*




1980 च्या दशकात युरोपातील स्थानिक शहरी नेतृत्वात आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय तसेच युरोपियन युनियनच्या प्रभावातून महत्वपुर्ण बदल झाले. या दशकात जर्मनी, इटली, नॉर्वे, इंग्लंड यांनी महापौरांच्या प्रत्यक्ष निवडीकडे वाटचाल केली तर फ्रांस आणि स्पेन यांनी महापौरांचे अधिकार वाढविण्याबरोबरचकॉलेजियम व्यवस्था अजूनच मजबूत केली.महापौरांच्या प्रत्यक्ष निवडणूका आणि कार्यकारी अधिकारातील वाढ याच्या परिणामातून येथिल स्थानिक शासनात स्वतंत्र नेतृत्व व स्वायत्त राजकारणाची वाढ झाली.
ब्रिटनमधील राजकीय संस्कृती ही पक्षीय राजकारणाचे प्रभुत्व असणारी आहे. जे नेते आपल्या मतदारसंघातील अनुयायांचा पाठींबा टिकवून ठेवतात त्यांचेच नेतृत्व जास्त् काळ टिकते ही ब्रिटनमधील परंपरा आहे.येथिल राजकारणात पक्षीय व्यवस्था अतिशय महत्वाची आहे तर स्थानिक पातळीवरही पक्षिय राजकारण फार महत्वाचे आहे. मात्र 2002 मध्ये येथे अंमलात आलेल्या स्थानिक शासनाच्या कायद्याने महापौरांच्या प्रत्यक्ष निवडणूकिला सुरुवात झाली.त्यामुळे स्थानिक राजकारणातील पक्षीय पध्दतीचे महत्व कमी झाले व स्थानिक निवडणूकीत अनेकदा अपक्ष व पक्षविरहीत नेतृत्व निवडून येऊ लागलेब्रिटनमधील हा बदल अमेरिकन अध्यक्षीय पध्दतीचे अनुकरण करणारा होता.

स्थानिक शासनाचा प्रकार आणि त्यांचे केंद्रशी असणारे संबंध याबाबत दक्षिण युरोपात उदा. इटली आणि फ्रांस येथे स्थानिक हितसंबंधांचे सुसुत्रिकरण आणि सत्तेचा समतोल उत्तर युरांपच्या तुलनेत जास्त राखला जोतो. 1980 पर्यंत दक्षिण युरोपात स्थानिक नेतृत्व केंद्र आणि स्थानिक घटकांशी मध्यस्थीचे काम करते त्याच बरोबर ते एक राष्ट्रिय सत्तेचे केंद्रस्थान आणि स्थानिक पातळीवरही प्रभावी असणारे नेतृत्व आहे. येथे कॉलेजियम पध्दत होती ज्यात निर्वाचित परिषदेस अधिमान्यता होती. त्या निर्वाचित परिषदेत निर्णय सामुहिक व कॅबिनेट पध्दतीनेच घेतले जात, ज्यात महापौर हा या परिषदांचा प्रमुख कार्यकारी असे. अर्थात ही पध्दती स्थानिक हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करणारी होती. महापौर आपल्या प्रयत्नातुन केद्रिय शासनांकडून स्थानिक पातळीवरील विविध मागण्या मान्य करुन घेत असत.

थोडक्यात महापौर हा केंद्र आणि स्थानिक हितसंबंधाचे महत्वाचा दुवा होता व तो एक प्रबळ सत्ता केंद्र म्हणूनही काम करत असे. याउलट उत्तर युरोपात निर्णय हे सामुह व पक्षहित जपणारे असत. नेतृत्वाच्या निर्णयास संघटनेच्या विविध विभागांच्या सहमतीची आवश्यकता लागत असे.

या आधिच्या कालखंडाचा विचार करता युरोपातील स्थानिक नेतृत्व राष्ट्र-राज्याच्या प्रभावाखालीच राहिले आहे. येथिल स्थानिक राजकारणावरही राष्ट्रीय राजकारणाचा पगडा होता. मात्र त्यात अमुलाग्रबदल झाला तो युरोपियन युनियनमूळे. युरोपियन युनियन च्या विविध संस्था आणि धोरणांमुळे येथिल राष्ट्रीय सरकारांपेक्षा स्थानिक शासनाला महत्व दिले गेले. राष्ट्रांच्या स्वतंत्र ओळखीपेक्षा युरोपियन अशी ओळख निर्माण केली जाऊ लागली. यातून येथिल राष्ट्रीय नेतृत्व व केंद्रीय पक्ष पध्दतीचे महत्व कमी कमी करुन स्थानिक शासने मजबूत करण्यावर भर दिला गेला.

1970-80 च्या दशकातील च्या सार्वजनिक सेवा आणि संस्थांच्या सुधारणातून युरोपात राजकीय विघटनास सुरुवात झाली. युरोपात अनेक देशांत निर्वाचित परिषदेस जास्तीच्या सत्ता देण्यात आल्या. त्यातुन विविध प्रदेशत स्थानिक संस्थांची निर्मिती झाली त्यातूनस्थनिक राजकिय नेतृत्व व त्यांतील हितसंबंध यांच्यात सत्ता संघर्ष तीव्र झाला. तसेच आर्थिकस्पर्धा आणि सार्वजनिक क्षेत्राच्या सुधारणेतून स्थीर रोजगार देणारे माठे उद्योग व सार्वजनिक क्षेत्रातील संघटनांचा ऱ्हास झाला. परंपरागत व्यवसायही नष्ट झाले परिणामी स्थानिक नेतृत्वासमोर व्यवहारीक समस्या उभा राहिल्या आहेत.

युरोपातील शहरी जीवन अतियश गुंतागुंतीचे आहे. येथील व्यक्ती व समाजाची मानसिकता केवळ स्वत:च्या समस्या सोडविणे, इतरांबरोबरील स्पर्धेत टिकुन राहणे आणि शहरी व्यवस्थेत स्वायत्त दर्जा टिकवून ठेवणे ही असते त्यामुळे विविध आर्थिक व राजकीय बदलांचा परिणाम येथिल समाज जीवनावरही झाला. सांस्कृतीक बदलातून उत्तर ओद्योगिक राजकीय संस्कृतीनिर्माण झाली. येथिल समाजात डावे आणि उजवे असे तितकेसे विभाजन व महत्व राहिलेले नाही उलट नवीन सामाजिक चळवळीतून पर्यावरणवादासारख्या विविध मुल्यांना महत्व प्राप्त झाले.

अशा प्रकारच्या अनेकविध बदलातून येथिल राजकीय धोरणे व निर्णय प्रक्रीया अतिशय गुंतागुंतीची झाली. शाहरी नेतृत्वाला स्वतंत्र निर्णय घेणे कठिण होत चालेले.नवीन समुहांना सामावणारे, विस्तृत व उदार निर्णय घेण्याबरोबरच बाजारपेठीय अर्थव्यवस्थेथिल हीतसंबधाचे राजकारणही सांभाळणे येथिल महापौरांना गरजेचे वाटू लागले.यामुळे स्थानिक राजकीय नेतृत्वाचा राजकीय अजेंडा येथिल सामाजिक व आर्थिक घटकांनी प्रभावित असतो.त्यामुळे आपले नेतृत्व राजकारणात टिकवून ठेवण्याच्या स्पर्धेतन येथिल नेतृत्वास अनेकदा सुधारणावादी भुमिका घेता येत नाही.संस्थात्मक विघटन आणि गोंधळात व्यक्ती आणि संघटनांमध्ये समन्वय साधण्याचे आव्हान युरोपातील स्थानिक नेतृत्वासमोर आहे.या विघटनातून नेतृत्वास कठीण परिस्थीती व विविध समस्यातूनच जावे लागत आहे. विविध घटकांत समन्वय व सहकार्य घडवून सामूहिक समस्या सोडविणे, हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करणे व त्यात समतोलही ठेवण्याचे कार्य नेतृत्वास करावे लागते.

युरोपातील शहरी राजकारणातील नेते हे उच्च सामाजिक व आर्थिक दर्जा असणारे आहेत. अनेक नेते हे आपल्या भोवती वलय निर्माण करण्याचा प्रयत्न करतात.आपली नावे विशिष्ट विकास प्रकल्प किंवा पायाभूत सुविधांच्या प्रकल्पाशी जोडतात, पक्षिय विचारसरणिपासून मात्र स्वत:ला जाणिवपूर्वक दुर ठेवतात. सत्तेतील स्पर्धेत टिकून राहण्यासाठी लोकानुनयी धोरणे आखतांनाच स्थानिक उद्योजकांनाही ते

जोडून ठेवतात. निवडणूकीप्रसंगी आपला प्रचार हा अतिशय व्यवसाईकपणे व प्रसारमाध्यमांचा वापरातून करतात. निवडणूकीत नविन डिजिटल नेटवर्क व स्व–जनसंपर्कने माध्यमातून आधुनिक राजकीय संपर्कात क्रांतीकारक बदल केले आहेत. नविन संपर्काच्या पदधतीतून राजकीय नेते आणि जनता यातील अंतर कमी होत आहे. सामाजिक प्रसारमाध्यमांमुळे नेतेआणि उमेदवार अभासी स्वरुपात सतत मतदारांना उपलब्ध असतात.सामाजिक प्रसारमाध्यमांद्वारे हे नेते प्रत्यक्ष संदेश, सुचनाआणि विनंत्या सामांन्यांपर्यंत तातडीने पोचवितात.

युरोपातील राजकीय नेतृत्व हे उत्कृष्ट प्रचारक व संपर्कप्रधानतेवर आधारित आहे. राजकिय प्रसारमाध्यमीकरण आणि जागतिकिकरणाच्या परिणामातून प्रचारात दिली जाणारी अतिरंजित व लोकानुनयी अश्वासने आणि निवडणुकीपश्चात नागरिकांचा होणारा भ्रमनिरास याचा दुरगामी परिणाम लोकशाहीतील विश्वास आणि अधिमान्यतेवर होत आहे.

**संदर्भ:**


1. Borraz Oliver and John Petter, The Transformation of Urban Political Leadership in western Europe in *International Journal of Urban and Regional research, Volume 28.1 March 2004, Page No. 107-20, Joint Editors and Blackwell Publishing 2004, UK and USA.)*
2. *LowndesVivien and LeachSteve,* Understanding Local Political Leadership: Constitution, Context and Capabilities in Local Government Studies, Vol.30, No.-4, year-2004, PP.557-575. Taylor and Francis Ltd. UK and USA.)
3. BARISIONE MAURO, Leadership, Political in International encyclopaedia of political Communication, 4th January, 2016 Publisher,Wiley Online LibraryUniversity of Milan. Italy
4. *HambletonRobin,SweetingDavid,* U. S. Style leadership for English Local Governance in *Public administration Review Vol-64 No.04 (Jul-August, 2004) pp-474-488* publisher *Wiley on Behalf of American Society for Public Administration. Downloaded from WWW.JSTOR.Com )*